ePaper

# फडणवीस रात्री उशिरा 'वर्षा'वर, एकनाथ शिंदेंसोबत खलबतं



| वर्ष - 6 | अंक - 194 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**महाईन्यूज**

**गुरुवार-शुक्रवार अंक नाही...**

**महाईन्यूज** या डिजिटल इपेपरच्या कार्यालयास 26 व 27 ऑक्टोबर 2022 रोजी दीपावली पाडवा तसेच बलिप्रतिपदानिमित्त सुटी असल्याने गुरुवार व शुक्रवार दिनांक 27 व 28 ऑक्टोबर रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची आमचे वाचक, विक्रेते, जाहिरातदार, हितचिंतक यांनी नोंद घ्यावी.

**- संपादक**

सुटीच्या दिवशीही **महाईन्यूज**शी कनेक्ट राहण्यासाठी खालील लिंकवर क्लिक करावे.

https://mahaenews.com/

www.mahaenews.com | |बुधवार|दिनांक 26 ऑक्टोबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# इंद्रायणी स्नानासाठी गर्दी!

## सूर्यगृहणानिमित्त भाविकांचा उत्साह : दानधर्म करीत केला मंत्रोच्चार

**| पिंपरी |**
**| महाईन्यूज | प्रतिनिधी|**

**आळंदी येथील नदीपात्रात अनेक साधकांनी नागरिकांनी आज (मंगळवारी) सायंकाळी साडेचारच्या सुमारास सूर्यग्रहण पर्व काळ ते सूर्यग्रहण संपेपर्यंत पवित्र इंद्रायणी नदीपात्रात स्नानासाठी गर्दी केली होती.**

**ग्रहण काळात काही धार्मिक परंपरेने क्रिया, जप, तप, मंत्रोच्चार पार पाडताना दिसत होते. नदीपात्रात काही नागरिक हातात तांब्याचे पात्र घेऊन कोणी नदीत जलर्पण करत होते तर कोणी हाताच्या ओंजळीत पाणी घेत मंत्रोच्चार करत ते पाणी नदीपात्रात अर्पण करत होते.**



संध्याकाळी सहानंतर खंडग्रास ग्रहण संपल्यानंतर अनेक साधकांनी, नागरिकांनी इंद्रायणी नदीत स्नान केले. यावेळी इंद्रायणी घाटावरती काही नागरिक दानधर्म करताना दिसत होते. या ग्रहण काळात काही मंदिरे बंद ठेवण्यात आली होती. तसेच हे खंडग्रास सूर्यग्रहण पाहण्याकरता असणारे खास चष्मे घेत हे ग्रहण काही नागरिकांनी विविध भागातून पाहिले.

### नागरिकांनी लुटला दुर्मिळ क्षणाचा आनंद...



**भारतातील बऱ्याच भागात सूर्यग्रहण दिसले. जेव्हा सूर्य आणि पृथ्वीच्या मध्ये जेव्हा चंद्र येतो, तेव्हा अशाप्रकारचं सूर्यग्रहण दिसतं. युरोप, उत्तर आफ्रिका आणि पश्चिम आणि मध्य आशियाच्या काही भागात राहणाऱ्या लोकांनाही हे सूर्यग्रहण दिसलं आहे. ईशान्येतील काही भागांव्यतिरिक्त भारतात बहुतेक ठिकाणी सूर्यग्रहण दिसलं आहे. भारतीय वेळेनुसार दुपारी २ वाजून २८ मिनिटांनी ग्रहणाला सुरुवात झाली. दुपारी साडेचारच्या सुमारास हे ग्रहण संपले. देशभरातील नागरिकांनी या दुर्मिळ क्षणाचा आनंद लुटला. हे सूर्यग्रहण पाहण्यासाठी अनेक ठिकाणी विशेष दुर्बिणीची व्यवस्था करण्यात आली होती. काही नागरिकांनी दुर्बिनीद्वारे सूर्यगृहनाच्या छटा पाहिल्या.**

# चिंचवड मतदार संघात ‘आनंदाचा शिधा’

## शंकर जगताप यांचा उपक्रम : रेशनकार्डधारकांची दिवाळी गोड

**| पिंपरी |**
**| महाईन्यूज | प्रतिनिधी|**

राज्य सरकारच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या आनंदाचा शिधा या योजनेअंतर्गत चिंचवड विधानसभा मतदारसंघातील रेशनकार्डधारकांना भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख व माजी नगरसेवक शंकर जगताप यांच्या हस्ते शिधा किटचे वाटप करण्यात आले. चिंचवड विधानसभा मतदारसंघातील ठिकठिकाणच्या रेशन धान्य दुकानांवर भाजपचे माजी नगरसेवक व प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शिधा वाटप कार्यक्रम पार पडले.

**ज्यातील भाजप-शिवसेना युती सरकारने दिवाळीसाठी नागरिकांना आनंदाचा शिधा देण्याचे जाहीर केले आहे. यात रेशनिंग दुकानातून १०० रुपयांत रवा, साखर, गोडतेल, चणाडाळ या चार वस्तू आनंदाचा शिधा म्हणून दिले जात आहे. हा शिधा ऑफलाइन पद्धतीने देण्याची घोषणा करण्यात आली आहे. त्यानुसार पिंपरी-चिंचवडमधील रेशनकार्डधारकांना आनंदाचा शिधा वाटप केले जात आहे. चिंचवड विधानसभा मतदारसंघातील रेशनकार्डधारकांना भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख व माजी नगरसेवक शंकर जगताप शंकर जगताप तसेच भाजपचे माजी नगरसेवक व प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या हस्ते आनंदाचा शिधा किटचे वाटप करण्यात आले.**



राज्यातील भाजप-शिवसेना युती सरकारने दिवाळीसाठी नागरिकांना आनंदाचा शिधा देण्याचे जाहीर केले आहे. यात रेशनिंग दुकानातून १०० रुपयांत रवा, साखर, गोडतेल, चणाडाळ या चार वस्तू आनंदाचा शिधा म्हणून दिले जात आहे. हा शिधा ऑफलाइन पद्धतीने देण्याची घोषणा करण्यात आली आहे. त्यानुसार पिंपरी-चिंचवडमधील रेशनकार्डधारकांना आनंदाचा शिधा वाटप केले जात आहे.

चिंचवड विधानसभा मतदारसंघातील रेशनकार्डधारकांना भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख व माजी नगरसेवक शंकर जगताप शंकर जगताप तसेच भाजपचे माजी नगरसेवक व प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या हस्ते आनंदाचा शिधा किटचे वाटप करण्यात आले.

पिंपळेसौदागर येथील जिजामाता महिला मंडळाच्या स्वस्त धान्य दुकानात हा कार्यक्रम झाला. यावेळी चिंचवड पुरवठा निरीक्षक स्नेहल गायकवाड, माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे, माजी नगरसेविका निर्मला कुटे, पवना सहकारी बँकेचे उपाध्यक्ष जयनाथ काटे, शहर भाजप आघाडी चिंचवड विधानसभा अध्यक्षा कुंदा भिसे, देवीदास काटे, मानसिंग काटे, बाळू काटे, निलेश कुंजीर, दिनेश काटे (पाटील), मल्हारी काटे, संजय काटे, अशोक चोंधे आदी उपस्थित होते.


# महावितरणकडून 'डल्ला'!

## बीलात साडे तीन लाखांपेक्षा जास्त रक्कमेची सूट : बिल्डरवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

**।पुणे । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

महावितरणची बाकी थकवून बिल्डरने पोबारा केल्याने फ्लॅट धारकांना किमान साडे आठ लाख रुपयांचा फटका बसण्याची शक्यता निर्माण झाली होती. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर सरचिटणीस भूपेंद्र मोरे यांनी केलेल्या आंदोलनानंतर महावितरणने वीजबिलात तब्बल साडे तीन लाखांपेक्षा जास्त रक्कमेची सूट दिली असून, बीलाची रक्कम अदा केल्यानंतर लगेच नवीन वीजमीटर जोडणीसाठी प्रक्रिया तात्काळ केली जाणार आहे.

महावितरणची बाकी थकवून बिल्डरने पोबारा केल्याने फ्लॅट धारकांना किमान साडे आठ लाख रुपयांचा फटका बसणार होता. फ्लॅटधारकांना महावितरणचे अधिकारी जुमानत नव्हते व उडवाउडवीची उत्तरे देत असल्याने ऐन सणासुदीत या तब्बल ५० फ्लॅटधारकांना अंधारात राहावे लागण्याची शक्यता निर्माण झाली होती. या बाबतीत भूपेंद्र मोरे यांनी आक्रमक भूमिका घेत आंदोलन केले. यामुळे महावितरणच्या अधिकारी यांनी देखील सकारात्मक प्रतिसाद देताना भूपेंद्र मोरे यांच्या मागण्या मंजूर करून बिलाची रक्कम कमी केली.



> आंदोलनानंतर महावितरणच्या अधिकाऱ्यांनी तातडीने पाऊले उचलताना आम्हाला बिलात सूट दिली असून यामुळे दिवाळी किमान साजरी करता आली आहे.
>
> **- दत्तात्रय जवळकर, फ्लॅटधारक**

> बिल्डरने केलेल्या चुकीची शिक्षा फ्लॅटधारकांना मिळाली असून त्याने केलेल्या फसवणुकीने येथील नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागला आहे. आता, महावितरणने बिल्डर विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करावा.
>
> **- भूपेंद्र मोरे, सरचिटणीस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी.**

महावितरणने बीलाच्या रकमेत जवळपास ३५ टक्के सूट दिली आहे. तसेच 'विलासराव देशमुख अभय योजना' अंतर्गत अजून बिलात सुट मिळणार असून बिलाची रक्कम कमी होणार आहे.

---

## बंजारा बिग्रेडचे शहराध्यक्ष प्रताप राठोड यांच्यातर्फे मिठाई वाटप

**।पिंपरी । महाईन्यूज ।**

शिवक्रांती कामगार संघटनेचे महाराष्ट्र संघटक आणि बंजारा ब्रिगेडचे शहराध्यक्ष प्रताप राठोड यांच्या वतीने कष्टकरी, कामगार कुटुंबियांना मिठाई वाटप करण्यात आले. तसेच, परिसरातील पत्रकार बांधवांनाही दिवाळीनिमित्त मिठाईचे वाटप करण्यात आले.





प्रताप राठोड म्हणाले की, गेली दोन वर्षे कोविडच्या महामारीमुळे सण-उत्सव साजरे करता आले नाही. मात्र, यावर्षी दिवाळी निर्बंधमुक्तपणे साजरी होत आहे. नागरिक उत्साहाने सण साजरा करीत आहेत. त्यामुळे गोरगरिब, कष्टकरी नागरिकांचीही दिवाळी गोड व्हावी. याकरिता खारीचा वाटा म्हणून मिठाई वाटप करण्यात आले.

## बसपाच्यावतीने महावितरणकडून थोरात कुटुंबाला मिळवून दिली चार लाख रुपयांची नुकसान भरपाई

**।पुणे । महाईन्यूज ।**

विजेच्या धक्क्याने निधन झालेल्या रोहीत थोरात यांच्या कुटुंबाला बहुजन समाज पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश महासचिव किरण आल्हाट यांच्या विशेष प्रयत्नातून 4 लाख रुपये महावितरणकडून लक्ष्मी पुजन दिवाळी दिवशी मिळवून दिले. 12 जुलै 2022 रोजी सायंकाळी 4 वाजेच्या सुमारास रोहित संपत थोरात याचा महावितरणची हाय टेन्शन वायर पडून रोहित धोरात याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली होती. तो सकाळी दूध घेण्यासाठी जात असताना ही घटना घडली होती. मात्र रोहित याच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्यास महावितरणकडून टाळाटाळ होत होती. बहुजन समाज पार्टीच्या वतीने प्रदेश महासचिव किरण अल्हाट यांनी वेळोवेळी पाठपुरावा करत थोरात कुटुंबियांना न्याय मिळवून दिला.



---

# देशाची हवा बिघडली; मुंबई-पुण्यात परिस्थिती वाईट

## दिल्लीत गंभीर स्थिती; सर्दी-खोकल्याला निमंत्रण

**।पिंपरी-चिंचवड ।पुणे ।**

दोन वर्षे महासाथीमुळे दिवाळीत फटाक्यांचा 'क्षीण क्षीण' आनंद लाभलेल्या नागरिकांनी यंदा फटाक्यांची पुरती हौस भागविल्याचा परिणाम देशातील हवेच्या गुणवत्तेवर झाला आहे. शहरी भागांमध्ये हवा बिघडली असून दिल्लीतील हवेची गुणवत्ता गंभीर स्तरावर पोहोचली आहे. मुंबई आणि पुण्यासह राज्यातील शहरगावांमध्येही वातावरणावर अतिरेकी फटाक्यांचा परिणाम झाल्याचे 'सफर' या संस्थेने नोंदविले आहे.



सफर या संस्थेकडून देशभरातील हवेच्या गुणवत्तेचे निरीक्षण करण्यात येते. मंगळवारी दुपापर्यंत पुण्याच्या हवेची गुणवत्ता समाधानकारक ते वाईट या स्तरावर होती. दुपारनंतर त्यात सुधारणा होऊन ती समाधानकारक पातळीवर गेली. तर मुंबईच्या हवेची गुणवत्ता वाईट स्तरावर असल्याचे दिसून आले. येत्या दोन दिवसांत पुण्याच्या हवेची गुणवत्ता सुधारण्याची, तर मुंबईच्या हवेची गुणवत्ता वाईट पातळीवरच राहण्याचा अंदाज 'सफर'कडून वर्तवण्यात आला आहे.

### राज्यात काय?

सफरच्या नोंदींनुसार सोमवार-मंगळवारी मुंबईची हवा वाईट पातळीवर, तर पुण्याची हवा वाईट ते मध्यम पातळीवर असल्याचे दिसून आले.

### आजारांना निमंत्रण..

हवेतील धूलीकणांचे प्रमाण वाढल्यास त्याचा कमी रोगप्रतिकारशक्ती असलेल्या नागरिकांना धोका असतो. करोना आटोक्यात आला असला, तरी पावसाळ्यापासून राज्यभरात दीर्घकाळ सर्दी-खोकल्याचे रुग्ण वाढत आहेत. सध्याच्या हवेत पुन्हा सर्दी-खोकला वाढण्याची भीती आहे.

### एका आठवड्यात..

गेल्या आठवड्यात मुंबई, पुणे, दिल्ली आणि अहमदाबाद या चार शहरांच्या हवेची गुणवत्ता समाधानकारक पातळीवर होती. मात्र एकाच आठवड्यात हवेच्या गुणवत्तेत बदल झाल्याचे दिसून येत आहे.

### थोडी माहिती..

सफरच्या हवा गुणवत्ता निर्देशांकानुसार (एक्यूआय) ५० पर्यंत एक्यूआय असलेली हवा चांगली, १०० ते २०० एक्यूआयदरम्यानची हवा सर्वसाधारण पातळीहून कमी, २०० ते ३०० एक्यूआयदरम्यानची हवा वाईट, ३०० ते ४०० एक्यूआय दरम्यानची हवा अत्यंत वाईट आणि ४०० एक्यूआयवरील हवा गंभीर मानली जाते. पावसामुळे हवेतील प्रदूषणकारी अतिसूक्ष्म कणांचे जमिनीवर राहात असल्याने हवेची गुणवत्ता चांगली असते. मात्र पावसाळा सरल्यानंतर गेल्या काही दिवसांत वाढलेल्या वाहनांच्या धुरामुळे हवेतील धूलिकणांचे प्रमाण वाढले आहे. तसेच दिवाळीमुळे करण्यात आलेल्या फटाक्यांच्या आतषबाजीमुळेही वातावरण धूरग्रस्त झाले आहे.

# ‘फायर फायटर’ वाहनांचे पथक सज्ज!




## महापालिका प्रशासनची तयारी : आगीच्या घटनांवर नियंत्रणासाठी यंत्रणा

**पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**शहरातील आगीच्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी अग्निशामक मोटार सायकलद्वारे पेट्रोलिंगद्वारे लक्ष ठेवले जात आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर कोणत्याही कारणास्तव आग लागून दुर्घटना घडू नये, यासाठी महापालिकेच्या वतीने उपाययोजना म्हणून खबरदारी घेतली जात असून २४X७ फायर फायटर वाहनांचे पथक सज्ज ठेवण्यात आले असल्याचे मुख्य अग्निशमन अधिकारी किरण गावडे यांनी सांगितले. लक्ष्मीपुजनाच्या दिवशी शहरातील काही भागात सायंकाळी ७ ते रात्री साडे दहाच्या सुमारास फटक्यांमुळे नऊ ठिकाणी लागलेल्या मध्यम स्वरूपाच्या आगीवर या वाहनांद्वारे तात्काळ नियंत्रण मिळवण्यात आल्याची माहितीही गावडे यांनी यावेळी दिली**

दीपावली हा सण आनंदी वातावरणात उत्साहाने साजरा होत आहे. दिवाळीनिमित्त शहरात विविध ठिकाणी तसेच घरोघरी विद्युत रोषणाई करण्यात येते, तसेच प्रकाशदिवे लावले जातात. शिवाय फटाक्यांची आतषबाजी देखील करण्यात येत आहे. हा उत्सव साजरा करताना आग लागून कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी महापालिकेच्या वतीने अग्निशामक विभागाच्या वतीने सूक्ष्म नियोजन करण्यात आले आले. आपत्ती व्यवस्थापन करताना शहरातील अरुंद रस्ते, वर्दळीच्या ठिकाणी लागलेल्या आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी तसेच आपत्कालीन स्थितीत मदत पुरवण्यासाठी पथके सज्ज ठेवण्यात आले असून त्यादृष्टीने नियोजन करण्यात आले आहे.

चिखली पोलीस स्टेशन आणि पिंपरी येथील इंदिरा गांधी पुलावर स्वतंत्र अग्निशामक बंब तैनात ठेवण्यात आला आहे. अग्निशामक मोटार सायकलद्वारे शहरातील विविध भागात गस्त घालण्यात येत आहे.

त्यामुळे आग लागलेल्या वर्दळीच्या ठिकाणी या वाहनाद्वारे वेळेत आणि सहज पोहोचता येणे शक्य होत आहे.

### सहा अग्निशामक मोटार सायकली...

महापालिकेच्या वतीने अग्निशमन विभागाच्या ताफ्यामध्ये गत जून महिन्यामध्ये सहा अग्निशामक मोटार सायकलचा समावेश करण्यात आला आहे.

या वाहनांचा उपयोग पिंपरी चिंचवड कार्यक्षेत्रातील अरुंद रस्ते, गल्लीमधील आगी, मार्केट परिसर अशा ठिकाणी आपत्कालीन परिस्थितीत तातडीने सेवा देऊन परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी करण्यात येत आहे.

महापालिकेच्या वतीने शहरात आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास त्याठिकाणी तातडीने सेवा व मदत पोहचवण्यास कोणताही अडथळा निर्माण होऊ नये यासाठी तसेच मोठ्या अग्निशामक गाड्यांना घटनास्थळी तातडीने पोहचवण्यासाठी रस्त्यावरील वाहतूक बाजूला करण्याकरिता अग्निशामक मोटार सायकलचा वापर करण्यात येत आहे.

घटनास्थळी ४० लिटर पाणी वाहून नेण्याची क्षमता असलेल्या या मोटार सायकल सोबत प्रथमोपचार पेटी, अग्निशामक वायू, ध्वनिक्षेपक यंत्र असे साहित्य देखील आहे.

---

## दिवाळीनिमित्त तृतीयपंथी बांधवांना ‘साडी-चोळी’

# वंचितांसोबत दिवाळी साजरी केल्याचे समाधान : जितेंद्र यादव

## पाटीलनगर- चिखली परिसरातील नागरिकांकडून कौतूक

**पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**समाजातील वंचित, दुर्लक्षित आणि आर्थिकदृष्या दुर्बल घटकांतील नागरिकांची दिवाळीसुद्धा उत्साहात साजरी झाली पाहिजे. सामाजिक सलोखा आणि बंधुभाव निर्माण झाला पाहिजे, अशा भावना युवा नेते जितेंद्र यादव यांनी व्यक्त केल्या.**



टाळगाव चिखली-पाटीलनगर येथील सामाजिक कार्यकर्ते जितेंद्र यादव, सामाजिक कार्यकर्त्या शितल यादव आणि माजी नगरसेविका स्व. अलकाताई यादव प्रतिष्ठानच्या वतीने यावर्षी गोरगरिब कष्टकरी आणि तृतियपंथी बांधवांसोबत दिवाळी साजरी करण्यात आली.

चिखली आणि परिसरातील तृतीयपंथी बांधव आणि सफाई कामगारांसह विविध सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या नागरिकांना मिठाई वाटप करण्यात आले. तसेच, तृतीपंथी बांधवांना साडी-चोळी देवून आदरभाव व्यक्त करण्यात आला. लक्ष्मीपूजनच्या निमित्ताने आयोजित केलेला हा पिंपरी-चिंचवडमधील एकमेव उपक्रम आहे.

> **समाजातील वंचित आणि दुर्लक्षित घटकांसह डॉक्टर, सफाई कामगार समाजिक बांधिलकीतून समाजासाठी झटणाऱ्या नागरिकांना मिठाई वाटप करुन यावर्षी दिवाळी साजरी केली. गेल्या दोन वर्षी कोविडच्या महामारीमुळे दिवाळी साजरी करता आली नाही. मात्र, कोविडमुळे माणुसकीची जाणीव प्रत्येकाला झाली. त्या मानवता धर्माचा वसा प्रत्येकाने जोपासला पाहिजे.**
> **- जितेंद्र यादव, सामाजिक कार्यकर्ते, पाटीलनगर, चिखली.**

**गोरगरिब कष्टकरी आणि तृतियपंथी बांधवांसोबत दिवाळी साजरी करण्यात आली. चिखली आणि परिसरातील तृतीयपंथी बांधव आणि सफाई कामगारांसह विविध सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या नागरिकांना मिठाई वाटप करण्यात आले. तसेच, तृतीपंथी बांधवांना साडी-चोळी देवून आदरभाव व्यक्त करण्यात आला. लक्ष्मीपूजनच्या निमित्ताने आयोजित केलेला हा पिंपरी-चिंचवडमधील एकमेव उपक्रम आहे.**

## संपादकीय

# ‘ऋषी’चे कूळ की..?

***उदारमतवाद खरोखर आचरणातही येऊ लागल्यास काय होते हे ब्रिटनमध्ये ऋषी सुनक, अमेरिकेत उपाध्यक्ष कमला हॅरिस आदींच्या उदाहरणांवरून समजून घेता येईल..***

पंतप्रधान म्हणून ब्रिटिश अर्थव्यवस्थेला शिस्त लावण्याचे काम करताना, सुनक यांची धनाढ्य पार्श्वभूमी हा मोठा अडथळा ठरू शकेल.. “लोकांना सोप्या गोष्टी लवकर कळतात,” असे ‘नटसम्राट’मधील अप्पा बेलवलकर लेकीच्या घरचा चाकर विठोबास सुनावतात. शिरवाडकरांच्या ‘नटसम्राट’ची प्रेरणा असलेल्या ‘किंग लिअर’चा लेखक शेक्सपियरच्या इंग्लंडातील जनतेस एव्हाना अप्पा बेलवलकराच्या सत्याची प्रचीती आली असावी. त्या देशाच्या पंतप्रधानपदी हुजूर पक्षाचे ऋषी सुनक यांची अखेर निवड झाली. हे अटळ होते. बोरिस जॉन्सन यांना पंतप्रधानपदावरून पायउतार व्हावे लागल्यानंतर त्या पदासाठी सत्ताधारी हुजूर पक्षात मतदान झाले. त्या वेळच्या प्रचारात लिझ ट्रस यांच्या बाजूने मतदारांनी कौल दिला. याचे कारण त्यांनी दाखवलेले करकपातीचे स्वप्न. ‘नटसम्राट’ म्हणतात त्याप्रमाणे लोकांस सोप्या गोष्टी लवकर आणि सहज कळतात. त्यामुळे ही करसवलत अशक्य आहे असे स्पष्ट सांगणाऱ्या सुनक यांच्यापेक्षा करसवलतीचे, इंधनकपातीचे स्वप्न दाखवणाऱ्या लिझ ट्रस यांच्यावर मतदारांनी विश्वास ठेवला. पण या ट्रसबाई आणि हे मतदार दोघेही तोंडघशी पडले. त्या वेळच्या प्रचारसभांत सुनक यांनी ट्रसबाईंच्या आश्वासनांची संभावना ‘परीकथा’ अशी केली होती. ट्रस यांनी ती अव्हेरली आणि आपले स्वप्न सत्यात येणारच येणार असा दावा केला. तो किती पोकळ होता हे अवघ्या ४४ दिवसांतच त्यांच्यावर पदत्यागाची वेळ आली त्यातून दिसले. परिणामी दणदणीत बहुमत असलेल्या हुजूर पक्षावर पुन्हा एकदा नेता निवडायची वेळ आली आणि गेल्या वेळची चूक या पक्षाने सुधारली. पंतप्रधानपदी ऋषी सुनक निवडले गेले. यानिमित्तानेत्या देशाच्या इतिहासात प्रथमच गौरेतर व्यक्ती पंतप्रधानपदी विराजमान होईल. सुनक केवळ भिन्नवर्णीय नाहीत. तर भिन्नधर्मीयदेखील आहेत. प्रॉटेस्टंट ख्रिश्चन बहुसंख्येने असलेल्या देशाच्या पंतप्रधानपदी सुनक यांच्या रूपाने प्रथमच हिंदूधर्मीय विराजमान होईल. हे शुद्ध त्या देशाचे मोठेपण. संपूर्ण निवडणुकीच्या काळात सुनक यांच्या वर्णाचा ना उल्लेख झाला ना धर्माचा. सानिया मिर्झा हिने पाकिस्तानी व्यक्तीशी निकाह लावल्यामुळे तिला पाकिस्तानी, पाक-धार्जिणी ठरवणाऱ्या; पण राजीव गांधी यांच्याशी विवाहानंतर सोनिया गांधी यांस मात्र इटालियन म्हणूनच हिणवणाऱ्या मानसिकतेच्या पार्श्वभूमीवर ब्रिटिश जनतेच्या मानसिक मोठेपणाचा आकार लक्षात यावा.

# वस्तूस्थिती दडवणारा भूक निर्देशांक






जागतिक भूक निर्देशांकाच्या प्रसिद्ध झालेल्या यादीमुळे मोदी सरकार आणि भारतीय जनता पार्टीच्या विरोधकांनी नेहमीप्रमाणे अपुऱ्या माहितीच्या आधारावर अपप्रचार सुरु केला. अनेक माध्यमातून, अनेक पद्धतीने मोदी सरकारला आणि भारतीय जनता पार्टीला बदनाम करण्याचा विडा उचललेल्या मंडळींनी थयथयाट करणे सुरु केले. हा निर्देशांक निश्चित करण्यासाठी वापरलेली पद्धत, या पद्धतीचे निकष याचा साकल्याने विचार करून त्या आधारे निष्कर्ष काढण्याऐवजी त्रोटक माहितीचा वापर करून त्याच्या आधारावर मोदी सरकार आणि भारतीय जनता पार्टी बद्दलचा विखार, आकस व्यक्त करण्याची स्पर्धाच लागल्याचे चित्र दिसले. आंतरराष्ट्रीय पातळीवर सशक्त, समृद्ध राष्ट्र म्हणून उदयास येत असलेल्या भारताची प्रतिमा मलीन करण्यासाठी अनेक शक्ती कार्यरत आहेत. त्या शक्तींनी अहवालातील निष्कर्ष आपल्या सोयीने वापरत मोदी सरकारला बदनाम करण्याची आपली हौस भागवून घेतली. हा अहवाल तयार करताना वापरण्यात आलेली कार्यपद्धती सदोष असल्याने त्या आधारे तयार होणारा अहवाल वास्तव आणि तथ्यांशी फारकत घेणारा असणार हे अपेक्षितच होते. या सर्वेक्षणासाठी ८ प्रश्न विचारले जातात आणि ३ हजार प्रतिसाद कर्त्यांच्या उत्तराच्या आधारावर कुपोषणाच्या शास्त्रशुद्ध मोजमापासाठी मुले आणि बालकांचे वजन, उंची मोजणे आवश्यक असते. मात्र तसे न करता दूरध्वनीवर दिलेल्या उत्तरांच्या आधारे निर्देशांक निश्चित करणे अनाकलनीय म्हणावे लागेल. कोरोना संकट काळात देशातील मजूर, कष्टकरी, कामगार, छोटे व्यावसायिक, विक्रेते या मोठ्या वर्गावर उपासमारीचे संकट उभे राहिले होते. कोरोना प्रसाराला अटकाव करण्यासाठी टाळेबंदी जाहीर करणे अपरिहार्य होते. टाळेबंदीमध्ये हातावर पोट असणाऱ्या मंडळीच्या पोटावर पाय आला त्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या वर्गाला डोळ्यापुढे ठेवत केंद्र सरकार तर्फे गरीब कल्याण अन्न योजना सुरु केली. हातावर पोट असणाऱ्यांना स्वस्त धान्य दुकानांच्या यंत्रणांद्वारे दर महा ५ किलो गहू, तांदूळ, डाळी मोफत देण्याच्या या योजनेने गोर-गरीब, वंचित वर्गाला उपासमारी पासून रोखले. मोदी सरकारच्या या योजनेची दखल जागतिक बँकेनेही घेतली. विरोधी पक्षातील अनेक मंडळी नोटा छापा आणि रोख रकमेचे अर्थसहाय्य द्या, अशी मागणी उच्चरवाने करीत होती. मोदी सरकारने या पद्धतीने वंचित, उपेक्षित वर्गाला सहाय्य देण्याऐवजी त्यांच्या पोटाला अन्न देण्यास प्रधान्य दिले. नोटा छापून अर्थसहाय्य करणाऱ्या काही देशांची अर्थव्यवस्था आता चांगलीच अडचणीत आली आहे, हा वेगळा भाग तो स्वतंत्र लेखाचा विषय होईल. चुकीच्या निकषांवर तयार करण्यात आलेला निर्देशांक हा भारताला बदनाम करण्याच्या खेळीचाच एक भाग आहे. जनतेची अन्य सुरक्षेची आणि पोषण विषयक गरज मोदी सरकार कडून पूर्ण होत असताना, गरीब कल्याण अन्न योजनेसारखी योजना ८० कोटी जनतेसाठी उपकारक ठरली असताना त्याकडे दुर्लक्ष करणारा हा अहवाल भारतातील स्थितीचे वास्तव चित्र प्रकट करत नाही. निर्देशांक निश्चित करताना कुपोषण, मुलांची/बालकांची कमी वाढ, अल्प पोषण आणि बाल मृत्यू असे चार निकष लावले जातात. यापैकी कमी वजन आणि बाल मृत्यू हे घटक थेट भुकेशी संबंधित नाहीत. अनुवंशिकता, वातावरण, स्वच्छता आदी घटक कमी वजन आणि बाल मृत्यूशी संबंधित आहेत. देशाच्या एकूण लोकसंख्येमध्ये कुपोषितांची संख्या किती आहे. ५ वर्षाखालील वयोगटातील मुलांमध्ये उंची न वाढण्याचे प्रमाण किती आहे.

# पुढच्या लक्ष्मीपूजनाला ‘डिजिटल रुपया’?

**डिजिटल आर्थिक व्यवहार तर आता नित्याचेच झाले आहेत, पण डिजिटल चलन वापरता आले तर? डिजिटल चलन म्हणजे काय आणि तिथवर पोहोचण्याच्या प्रवासाविषयी...**




आपण आज सर्रासा वापरतो, त्या अपरिवर्तनीय कागदी चलनाला आधार आहे फक्त २०० कोटी रुपयांचा. या २०० कोटी रुपयांत ११५ कोटी रुपयांचे सोने आहे आणि ८५ कोटी रुपयांचे रिझर्व्ह बँकेने निर्देशित केलेले रोखे, परकीय चलन इत्यादी आरबीआयकडे राखीव (रिझर्व्ह) ठेवलेले आहे. म्हणून ती रिझर्व्ह बँक. केवळ या २०० कोटी रुपयांच्या आधारावर आरबीआय वाट्टेल त्या किमतीच्या वाट्टेल तेवढ्या नोटा छापू शकते.

आपण गरीब आहोत, असे प्रत्येकाला वाटते. आरबीआयने जर जास्त नोटा छापून मला दिल्या तर माझी गरिबी नक्की संपेल, असेही वाटते. पण प्रत्यक्षात आरबीआयने अधिक नोटा छापून सर्व लोकांना वाटल्या तर त्याचा कोणालाही उपयोग होणार नाही, फक्त अर्थव्यवस्थेतल्या पैशांची संख्या वाढेल. वस्तू, अन्नधान्य वाढणार नाही. म्हणजेच महागाई वाढेल, म्हणून महागाईला मराठीत चलनवृद्धी म्हणतात.

म्हणजेच पैसा मला वस्तू विकत घेण्यासाठी किंवा वस्तू विकण्यासाठी माध्यम म्हणून हवा आहे. पैसे वस्तू-सेवा विनिमयाचे माध्यम आहेत. तसेच पैसे वस्तूचे एकक आहे. म्हणजे मला १० रुपयांचे मीठ किंवा साखर दे, असे सांगता येते म्हणजे पैशाने वस्तू मोजता येते. आणि काल विकत घेतलेल्या भाजीचे, दुधाचे पैसे मी आज देऊ शकतो. ही आहेत पैशाची मूलभूत कार्ये. ही सर्व कार्ये चलन म्हणजे प्रचलित नोटा, नाणी, धनादेश (चेक), इ. करीत असतात. पूर्वी एका ब्रेडच्या प्रसिद्ध दुकानात सुट्ट्या पैशांऐवजी टोकन दिले जात असे, तसेच एक दूधवालादेखील त्याच्या नावाचे टोकन/ कूपन देत असे. देणाऱ्याला आणि घेणाऱ्याला त्यात अडचण नव्हती. ते टोकन/ कूपन चलन म्हणून वापरले जात होते. इथे सरकारच्या/ आरबीआयच्या मान्यतेचा प्रश्नच उद्भवत नव्हता. याचाच अर्थ असा की ज्या वस्तूला, कागदाला, धातू किंवा चामड्याच्या तुकड्याला विनिमयाचे माध्यम म्हणून सर्वांची मान्यता आहे त्याला पैसा म्हणतात, हीच पैशाची व्याख्या.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# गोवंश हत्या तस्करांवर कायदेशीर कारवाई व्हावी!

## जिल्हाधिकार्यांना निवेदन : अखिल भारतीय गो-रक्षा समितीचा आंदोलनाचा इशारा

।पुणे ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे ग्रामीण क्षेत्रातील विशेषतः मावळ तालुक्यातील मोकाट जनावरे - गाई-बैल, वासरे व गोठ्यांमधील मालकी हक्काची पाळीव जनावरांची मोठ्या प्रमाणात रातोरात तस्करी केली जात आहे. शहराबाहेर नेऊन या जनावरांना कापून मांस शहरात विक्रीसाठी पाठविले जात आहे. अशा प्रकारचे घृष्णास्पद काम काही समाजकंटकांद्वारे सध्या पुण्यासह पिंपरी-चिंचवड व लगतच्या भागात मोठ्या प्रमाणत सूरू आहे.**



यावर ताबडतोब प्रतिबंध घालावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा अखिल भारतीय गो-रक्षा समितीने जिल्हाधिकार्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

सदर निवेदनात म्हटले आहे की, गाय ही आमच्या हिंदू संस्कृतीची गोमाता असून, हिंदू अस्मितेचे प्रतिक आहे, असे असताना बेकायदेशीरपणे गोमातेची तस्करी करून हत्या केली जात आहे. हा प्रकात अत्यंत घृष्णास्पद असून, हिंदू धर्मियांसाठी लांधनास्पद आहे. सदर प्रकरणामध्ये पैशाची मोठी उलाढाल होत असल्याने कित्येक व्यापारीही नफ्याकरिता या व्यवसायामध्ये सक्रियपणे सहभागी होतात.

पुणे जिल्ह्यात सामाजिक व धार्मिक सलोखा, शांतता न बिघडता पूर्ववत राहण्याकरीता आपण जातीने लक्ष घालून संबंधित चोरट्यांवर, व्यापारी, दलाल, तसेच शहरी व ग्रामीण भागातील गोमांस विक्रेत्यांची व सदर व्यवसायास प्रोत्साहन देणारे धर्मामार्तंड, समाजकंटक यांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करावी. या संबंधित वडगाव मावळ, चाकण, पिंपरी-चिंचवड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झालेला आहे.

### तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा

**अशा दुष्ट प्रवृत्ती, समाजकंटकांवर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा अखिल भारतीय गोर-क्षा समितीचे संस्थापक अध्यक्ष रमेश ब्रह्मा, राष्ट्रीय अध्यक्ष सूर्याजी महापात्रा, राष्ट्रीय प्रदेश सचिव संजय मरकड, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सचिनभाऊ काळभोर यांनी जिल्हाधिकार्यांना निवेदनाद्वारे दिला आहे.**

---

# भाऊसाहेब जाधव परिवार यांच्यातर्फे विधायक उपक्रम

## दीपावलीनिमित्त माय माऊली केअर सेंटरमधील वृद्धांना दिले स्वादिष्ट भोजन

। पुणे । महाईन्यूज ।

मराठवाडा कॉलेजचे भाऊसाहेब जाधव आणि परिवार यांच्यातर्फे दीपावलीनिमित्त माय माऊली केअर सेंटरच्या वतीने स्वादिष्ट भोजन देण्यात आले. कात्रज येथील कात्रज-कोंढवा रोड, इंडियन ऑईल पेट्रोल पंपासमोर, हॉटेल महाबळेश्वरच्या पाठीमागे असलेले माऊली केअर सेंटरमधील वृद्ध व अंथरुणाला खिळलेल्या आजी आजोबांची सेवा करणार्या संस्थेमध्ये दिवाळीनिमित्त स्वादिष्ट भोजन देण्यात आले.

यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विठ्ठलराव वरुडे पाटील, मराठवाडा कॉलेजचे उपप्राचार्य रमेश पंडित यांचे माय माऊली केअर सेंटरद्वारे आभार पत्र, सन्मानचिन्ह, शाल देऊन सन्मानित करण्यात आले.

तसेच आभारही मानले. तसेच सर्वांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या.



# फटाकेविरहीत गावांत पाखरांची दिवाळी

। नागपूर। महाईन्यूज ।

तामिळनाडूतील वेतांगुडीपट्टी आणि पेरिया कोल्लुकुडीपट्टी या गावातील ग्रामस्थ गेल्या अनेक दशकांपासून फटाके न फोडता दिवाळी साजरी करत आहेत. लगतच्या वेतांगुडी पक्षी अभयारण्यातील पक्ष्यांना इजा पोहचू नये म्हणून गावकऱ्यांनी घेतलेल्या या निर्णयाचे यंदा सर्वच स्तरावर कौतुक केले जात आहे.

वेतांगुडी, पेरिया कोल्लुकुडी पट्टी आणि चिन्ना कोल्लुकुडी पट्टी येथील सिंचन तलावावर काही वर्षांपूर्वी स्थलांतरित पक्ष्यांनी गर्दी केली होती. तेव्हा स्थानिक ग्रामस्थांनी फटाके न फोडता दिवाळी साजरी केली. त्यानंतर दुसऱ्या वर्षी देखील त्याठिकाणी पक्षी आले आणि तेव्हापासून गावकऱ्यांनी फटाके न फोडण्याचा नियमच घालून घेतला.

हे पक्षी पाळीव प्राण्यांसारखे आहेत आणि त्यांना त्रास झालेला सहन होणार नाही, असे गावकऱ्यांचे म्हणणे आहे. त्यांनी त्यांच्या तरुण पिढीला देखील फटाके फोडण्यापासून दूर ठेवले आहे.

---

# पिंपरी चिंचवड शहरांत गुटखा विक्री दारात, माफियांचा व्यवसाय जोरात!

## गुटखा विक्रीचे केंद्र म्हणून पिंपरी-चिंचवड शहराची बनतेय ओळख

।पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज

पिंपरी चिंचवड शहरांत गुटखा विक्री जोरात सुरू असून पिंपरी-चिंचवड शहर व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर गुटखा विक्री जोरात सुरू आहे. महाराष्ट्र शासनाने गुटखा विक्री बंदी घातली असून, गुजरात व कर्नाटक या राज्यातून महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर चोरुन गुटखा आणला जात असून, मोठ्या प्रमाणावर गुटखा विक्री सुरू आहे. गुटखा विक्री प्रकरणात मोठं रॅकेट कार्यरत असल्याचे समजतेय. याप्रकरणी पिंपरी-चिंचवड भाजपचे तथा सामाजिक कार्यकर्ते सचिन काळभोर यांनी मुख्यमंत्री कार्यालयास ईमेलद्वारे निवेदन दिले असून, त्यांच्या निवेदनाची दखल घेत मुंबई पोलिस आयुक्तालयाकडे ही तक्रार पाठविण्यात आलेली आहे.



पिंपरी-चिंचवड शहर पोलिस तसेच ग्रामीण पोलीस अधिकारी व कर्मचारी गुटखा विक्री रॅकेटमध्ये सहभागी आहेत. शहरातील प्रत्येक हातगाडी व टपरी ह्या ठिकाणी गुटखा सहज उपलब्ध होत आहे. मुख्यतः शाळा कॉलेज व मुख्य बस स्टॉप रेल्वे स्टेशन रुग्णालय तसेच गल्ली बोळात गुटखा विक्री सुरू आहे.

विशेष बाब म्हणजे पिंपरी-चिंचवड शहर गुटखा विक्री राजधानी म्हणून ओळखली जावू लागलीय. गुटखा विक्री प्रकरणातील टपरी व हातगाडी धारकांना गुटखा विक्रीप्रकरणी पोलीस कर्मचारी ह्यांना मासिक अडीच हजार रुपये हप्ता द्यावा लागत आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील सर्व भागात प्रत्येक पोलिस स्टेशन हद्दीत गुटखा विक्री प्रकरणात पोलिस स्टेशन येथील हप्ता वसुली कर्मचार्यांना मासिक गुटखा विक्री हप्ता द्यावा लागतो. पोलिस प्रशासन फक्त गुटखा विक्री प्रकरणात छोटी मोठी कारवाई कागदोपत्री नोंद करून दाखवत असते.

वर्तमानपत्रात गुटखा विक्री प्रकरणात गुन्हा नोंद केला म्हणून दाखवण्यात येते. मात्र वस्तुस्थिती वेगळी असून, पिंपरी-चिंचवड शहर व ग्रामीण भागात गुटखा विक्री प्रकरणात पुणे व पिंपरी-चिंचवड गुटखा राजधानी म्हणून प्रसिद्ध झाली आहे. सणासुदीच्या काळात परराज्यातून मोठ्या प्रमाणावर गुटखा विक्री करण्यासाठी दलाल व मोठे व्यापारी सरसावले असून, पोलिस आयुक्त व पोलिस अधिकारी व कर्मचारी यांच्या आशीर्वादाने गुटखा विक्री पिंपरी चिंचवड शहरातील गल्ली बोळात सुरू असल्याचे भयानक चित्र पहायला मिळत आहे.



"खुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुटखा विक्री बंदी प्रकरणात दखल घेऊन पिंपरी-चिंचवड व पुणे येथील गुटखा विक्री प्रकरणात दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्या विरोधात कारवाई तसेच गुटखा विक्री प्रकरणातील मोठ्या व्यापार्यांच्या विरोधात कडक कारवाई करण्यात यावी.

**- सचिन काळभोर**
**सामाजिक कार्यकर्ते**

# मायावतींचा मास्टरप्लॅन!

## मुस्लीम मतांसाठी आखली खास रणनीती, उत्तर प्रदेशमध्ये आगामी निवडणुकीत चित्र बदलणार?

। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उत्तरप्रदेशच्या राजकारणात बहुजन समाज पार्टीचा ( बसपा ) जनाधार मागील काही दिवसांमध्ये घटलेला आहे. याच कारणामुळे बसपा हा पक्ष २०२२ च्या विधानसभा निवडणुकीत कमाल दाखवू शकला नाही. मात्र बसपाच्या सर्वेसर्वा मायावती या पुन्हा एकदा उत्तर प्रदेशच्या राजकारणात सक्रिय झाल्या असून त्यांनी २०२४ साली होणाऱ्या लोकसभा निवडणुकीसाठी रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे.**



त्यांनी मुस्लीम मतदारांचे लक्ष वेधण्यासाठी इम्रान मसूद यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवली आहे. काही दिवसांपूर्वीच त्यांनी सपा पक्षातून बसपामध्ये प्रवेश केला आहे. विशेष म्हणजे मसूद यांनी पक्षात प्रवेश करताच मायावती यांनी त्यांच्यावर पश्चिम उत्तर प्रदेशचे संयोजक म्हणून नेमणूक केली आहे. सोबतच त्यांच्यावर उत्तराखंडचीही जबाबदारी सोपवली आहे. इम्रान मसूद हे बहुजन समाज पार्टीचे मुस्लीम चेहरा ठरण्याची दाट शक्यता आहे. त्या दृष्टीने बसपाकडून रणनीती आखण्यात येत आहे. पक्षात प्रवेश करताच मसूद यांच्यावर पश्चिम उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यांना येथील मुस्लीम मतदारांशी संवाद साधण्याची तसेच सभा बैठकांच्या माध्यमातून या मतदारांना पक्षापर्यंत आणण्यासाठी प्रयत्न करावा, असे सांगण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार मायावती यांनी पश्चिम उत्तर प्रदेशच्या विभागीय समन्वयकांना मसूद यांच्या काही बैठका, सभा आयोजित करण्याचे आदेश दिले आहेत.

मसूद यांच्याकडे मुरादाबाद, सहारनपूर, बरेली, मेरठ या भागाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. तसेच या भागात होणाऱ्या सर्व बैठकांमध्ये मसूद हे सर्वात शेवटी बोलतील. तसेच त्यांना बोलण्यासाठी जास्तीत जास्त वेळ द्यावा, असे निर्देशही मायावती यांनी येथील स्थानिक नेत्यांना दिले आहेत.

पश्चिम उत्तर प्रदेशसह मायावती यांनी मसूद यांच्यावर उत्तराखंडचीही जबाबदारी सोपवली आहे. मसूद यांना उत्तराखंडमधील डेहराडून, हरीद्वार, उधम सिंह नगर, नैनीताल या भागावर लक्ष्य केंद्रित करण्यास सांगण्यात आले आहे. या भागात मुस्लीम लोकसंख्या जास्त असल्यामुळे मसूद यांच्यावर ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत ते बसपा पक्षातील मुस्लीम चेहरा ठरण्याची शक्यता आहे. तशी चर्चा बसापाच्या नेत्यांमध्ये सुरू आहे.

## महापालिका निवडणूक कधी होईल हे ईश्वर आणि न्यायालयालाच ठाऊक

। मुंबई । महाईन्यूज ।

इतर मागासवर्ग समाजाच्या (ओबीसी) राजकीय आरक्षणाचा मुद्दा निकाली निघाल्यानंतरही स्थानिक स्वराज्य संस्था विशेषतः महापालिका निवडणुकीचा संभ्रम कायम आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी दिवाळीनिमित्त पत्रकारांशी अनौपचारिक संवाद साधताना महापालिका निवडणूक कधी होईल हे ईश्वर आणि न्यायालयालाच ठाऊक, असे सांगत महापालिका निवडणुका नेमक्या कधी होतील, याबाबत अनिश्चितता कायम असल्याचे स्पष्ट केले.लोकशाही व्यवस्थेत प्रशासकाने फार काळ संस्था चालवणे योग्य नाही.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोग ही स्वतंत्र संस्था आहे. निवडणुका घेण्याचे अधिकार



या संस्थेला आहेत. महापालिका निवडणुकीचा विषय राज्य सरकारकडे प्रलंबित नाही. न्यायालयाने जैसे थे परिस्थिती ठेवण्याचे आदेश दिल्याने निवडणुकीचा विषय हा न्यायालय आणि आयोगाकडे आहे.

त्यामुळे महापालिका निवडणुका कधी होतील हे ईश्वर आणि न्यायालयालाच ठाऊक असल्याचे फडणवीस म्हणाले. राज्य सरकारचे शेतकऱ्यांकडे नीट लक्ष आहे.

शेवटच्या पावसापर्यंत राज्य सरकारने शेतकऱ्यांना सात हजार कोटी रुपयांची मदत केली. आमचे सरकार मदत करणारे आहे.

## शेतकऱ्यांसाठी कृषी कृती विकास आराखडा तयार करणार मुख्यमंत्र्यांची 'वर्षा'वर शेतकऱ्यांसोबत दिवाळी

। मुंबई । महाईन्यूज ।

मुख्यमंत्र्यांचे शासकीय निवासस्थान असलेल्या 'वर्षा' बंगल्यावर राज्यातून आलेल्या शेतकरी कुटुंबियांसोबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सहकुटुंब दिवाळी साजरी केली. त्यांच्यासोबत फराळाचा आस्वाद घेतला. यावेळी राज्यातील शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी कृषी कृती विकास आराखडा तयार करीत असल्याचे सांगतानाच नैसर्गिक आपत्तीत सरकार तुम्हाला वाऱ्यावर सोडणार नाही. तुम्ही धीर सोडू नका. राज्य शासन तुमच्या पाठीशी असल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

दिवाळीनिमित्त वर्षावर आलेल्या शेतकऱ्यांशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे संवाद साधला. बळीराजा हा राज्याच्या विकासात महत्वाचा घटक असून



त्याच्यासाठी आम्ही महत्वाचे निर्णय घेतले आहेत. अतिवृष्टी, अवकाळी पाऊस यांमुळे बळीराजाला नैसर्गिक आपत्तीला तोंड द्यावे लागते. याप्रसंगी मी आपणा सर्वांना ग्वाही देतो की, तुम्ही धीर सोडू नका, खचू नका. आम्ही तुमच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहोत. राज्यातील शेतकऱ्यांना 50 हजार रुपयांच्या मर्यादित प्रोत्साहनपर लाभ देण्याचा निर्णय घेतला आणि त्याची तातडीने अंमलबजावणी केली. महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत एकाच वेळी 7 लाख शेतकऱ्यांच्या खात्यात 2500 कोटी रुपये प्रोत्साहनपर रक्कम जमा करण्यात आली. सेंद्रीय शेतीवर भर देतानाच विविध सिंचन प्रकल्पांच्या कामांना मंजूरी देऊन लाखो हेक्टर जमीन सिंचनाखाली आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. शेतकरी आणि कृषी विकासासाठी घेतलेल्या विविध निर्णयांची माहिती मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. शेतकरी बांधवांनी पारंपारिक शेतीला आधुनिकतेचे बळ देऊन कमी खर्चात जास्त उत्पादन देणारी शेती करण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले. बळीराजाला चांगले दिवस येवू दे अशी प्रार्थना करीत मुख्यमंत्र्यांनी सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी प्रास्ताविक केले. आमदार सर्वश्री प्रताप सरनाईक, प्रवीण दरेकर, माजी खासदार आनंद अडसुळ यांच्यासह सहकार विभागाचे अपर मुख्य सचिव अनुपकुमार, मदत व पुर्नवसन विभागाचे प्रधान सचिव असीमकुमार गुप्ता, कृषी विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, आयुक्त धीरजकुमार, सहकार आयुक्त अनिल कवडे आदी उपस्थित होते.

## युगांडामध्ये दृष्टिहीन मुलांच्या शाळेला भीषण आग, ११ जणांचा

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

युगांडा देशातील दृष्टिहीन मुलांच्या शाळेला आग लागल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या आगीमध्ये ११ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. मंगळवारी (२५ ऑक्टोबर) सकाळी ही आग लागल्याचे म्हटले जात असून आगीचे कारण अद्याप अस्पष्ट आहे.

मिळालेल्या माहितीनुसार युगांडामधील मुकोनो जिल्ह्यातील सलमा स्कुल या दृष्टिहीन मुलांसाठीच्या शाळेला अचानकपणे



आग लागली. या आगीत आतापर्यंत ११ जणांचा मृत्यू झाला आहे. तर ६ जणांची प्रकृती चिंताजनक आहे. जखमींना किसोगा येथील हेरोना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार केले जात आहेत. युगांडा पोलिसांनी तशी माहिती दिली आहे. या घटनेबाबत युगांडामधील मंत्री काहिंदा ओटाफिरे यांनी अधिक माहिती दिली आहे. या आगीत मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये बहुतांश छोटी मुलं आहेत. घडलेल्या घटनेची पूर्ण चौकशी केली जाईल. या घटनेची चौकशी केल्यानंतर दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे ओटाफिरे म्हणाले आहेत.

## “मी बोल्ड भूमिकेसाठी...” मराठमोळ्या सायली संजीवने दिले स्पष्ट उत्तर



मराठी चित्रपटसृष्टीतील सोज्वळ अभिनेत्री म्हणून सायली संजीवला ओळखले जाते. काही दिया परदेस या मालिकेतून सायली घराघरात पोहोचली. सौंदर्य आणि उत्तम अभिनयशैली यांच्या जोरावर सायलीने सिनेसृष्टीत तिचे अढळ स्थान निर्माण केले आहे. सायलीने आतापर्यंत अनेक चित्रपटात काम केले आहे. या चित्रपटातील तिच्या अभिनयाचे कायमच कौतुक होत असते. आता लवकरच ती एका ऐतिहासिक भूमिकेत दिसणार आहे. या निमित्ताने तिने झी मराठीवरील ‘बस बाई बस’ या कार्यक्रमात हजेरी लावली.

बस बाई बस या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिनेता सुबोध भावे करत आहे. या कार्यक्रमावेळी तिने अनेक गोष्टींवर भाष्य केले. चित्रपट, मालिका, तसेच तिचे खासगी आयुष्य याबद्दलही सायली संजीवने सांगितले. यावेळी सुबोध भावेने तुला एखाद्या बोल्डसाठी विचारणा झालीय का? असा प्रश्न तिला विचारला. त्यावर तिने स्पष्ट शब्दात उत्तर दिले.

## जावई असावा तर असा! सासूबाईंची काळजी घेणाऱ्या निक जोनसची सोशल मीडियावर चर्चा

**नेटकरी निक जोनसच्या वागण्याचं जोरदार कौतुक करताना दिसत आहेत.**

बॉलिवूड अभिनेत्री प्रियांका चोप्रा तिच्या सोशल मीडिया पोस्टमुळे अनेकदा चर्चेत असते. परदेशात राहत असूनही प्रियांका भारतीय संस्कृती अजिबात विसरलेली नाही. ती नेहमीच भारतीय परंपरेनुसार सण- उत्सव साजरे करताना दिसते. सध्या दिवाळीच्या निमित्ताने प्रियांका चोप्रा, निक जोनस आणि प्रियांका चोप्राची आई मधू चोप्रा यांचे काही फोटो सोशल मीडियावर व्हायरल होताना दिसत आहे. जे पाहिल्यांनंतर नेटकरी निक जोनसच्या वागण्याचं जोरदार कौतुक करताना दिसत आहेत.

सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या फोटोंमध्ये प्रियांकाची आई मधू चोप्रा पारंपरिक भारतीय पोशाखात दिसत आहेत. तर निक जोनस ब्लॅक आउटफिट्समध्ये खूपच हँडसम दिसत आहे. सोशल मीडियावर लोक या फोटोंचे कौतुक करत आहेत. एका युजरने लिहिलं, ‘खूप सुंदर फोटो.’ दुसऱ्या एका यूजरने लिहिलं, ‘आम्ही त्या प्रत्येक व्यक्तिवर प्रेम करतो जो आपल्या सासूवर प्रेम करतो.’ आणखी एका युजरने लिहिलं, ‘जावई असा असावा.’ याशिवाय अनेक युजर्स या फोटोंवर कमेंट्स करत निक जोनसवर प्रेमाचा वर्षाव करत आहेत.



## निधी भानुशालीवर चाहते नाराज



सब टिव्हीवरील ‘तारक मेहता का उल्टा चष्मा’ ही मालिका अनेक वर्षांपासून प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहे. ही मालिका सुप्रसिद्ध लेखक तारक मेहता यांच्या ‘दुनिया ने ओंढा चष्मा’ या लेखांवर आधारित आहे. या मालिकेने टीआरपीचे बरेचसे विक्रम मोडले. या मालिकेतील कलाकारांनाही प्रेक्षकांकडून प्रचंड चांगला प्रतिसाद मिळताना दिसतो. यात काम करणाऱ्या सर्व कलाकारांचे फॅन फॉलोईंग जबरदस्त आहे. आता यात सोनू भिडेची भूमिका करणारी निधी भानुशाली चर्चेत आली आहे. या फोटोंमध्ये निधीसोबत तिचे संपूर्ण कुटुंब दिसत आहे. पण हे तिच्या दिवाळी सेलिब्रेशनचे फोटो पाहून प्रत्येकालाच आश्चर्याचा धक्का बसला आहे. कारण या फोटोंमध्ये तिला ओळखणे कठीण झाले आहे. निधीने दिवाळीपूर्वी तिचा लूक बदलला असून आता तिने केस अगदी लहान केले आहेत. हे फोटो पोस्ट करताना तिने कॅप्शनमधून चाहत्यांना दिवाळीच्या शुभेच्छाही दिल्या आहेत. मात्र तिच्या काही चाहत्यांना तिचा बदललेला लूक आवडला नाही.

## पूजा सावंत नक्की कोणत्या अभिनेत्याला करतेय डेट?

अभिनेत्री पूजा सावंत नेहमीच तिच्या कामामुळे चर्चेत असते. तिचा शेवटचा ‘दगडी चाळ’ चित्रपट प्रदर्शित झाला. त्यानंतर काही दिवसांपूर्वीच तिचं एक गाणं प्रदर्शित झालं. या गाण्याच्या व्हिडीओमध्ये पूजा अभिनेता वैभव तत्त्ववादीबरोबर दिसली. प्रेक्षकांचाही या गाण्याला बराच प्रतिसाद मिळाला. त्यानंतर अभिनेता भूषण प्रधानबरोबर तिने दिवाळीनिमित्त एक जाहिरात केली. यादरम्यान तिच्या रिलेशनशिपबाबत जोरदार चर्चा रंगू लागल्या. त्याचं झालं असं की, पूजा व वैभवने ‘चल अब वहाँ’ या आपल्या गाण्याच्या प्रमोशनदरम्यान रोमँटिक फोटोशूट केलं. हे फोटोशूट पाहून तुमची जोडी परफेक्ट आहे, तुम्ही एकमेकांना डेट करत आहात का?, यंदा कर्तव्य आहे अशा अनेक कमेंट नेटकऱ्यांनी केल्या. तर भूषण प्रधानबरोबर जाहिरात केल्यानंतरही असंच काहीसं घडलं.

भूषणबरोबरच्या जाहिरातीचा व्हिडीओ शेअर केल्यानंतर नेटकऱ्यांनी त्याच्याशी पूजाचं नाव




जोडलं. तुम्ही दोघं एकत्र खूप छान दिसता, तुमची जोडी सुंदर आहे अशा कमेंट येऊ लागल्या. या सगळ्या कमेंटना पूजाने एक पोस्ट शेअर करत उत्तर दिलं आहे. खरं तर वैभव-भूषण दोघंही तिचे जवळचे मित्र आहेत. याचबाबत आता तिनेही खुलासा केला आहे.

ती म्हणाली, “ही काही मैत्रीदिनाची पोस्ट नाही. पण खऱ्या मित्रासारखं तुम्ही दोघंही माझ्या पाठिशी खंबीर उभे राहिलात त्यासाठी धन्यवाद. आपण एकमेकांना खूप वर्षांपासून ओळखतो. यादरम्यान अनेक चढ-उतार आले. काही चांगल्या तर काही वाईट आठवणीही आहेत. काहीही झालं तरी एकमेकांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहणार हे आपल्याला माहित आहे.

## पारंपरिक वेशात आयराने दिल्या दिवाळीच्या शुभेच्छा

देशातील पंतप्रधांनापासून ते बॉलिवूड सेलिब्रेटींपर्यंत सगळेचजण दिवाळीच्या शुभेच्छा देत आहेत. बॉलिवूडचे कलाकारदेखील हा सण मोठ्या आनंदाने साजरा करत आहेत. आपापल्या घरी दिवाळी पार्टीचे आयोजन करत आहेत. सध्या चर्चा आहे ती स्टार किड्सची, आजकाल पार्ट्यांमध्ये स्टार किड्स दिसू लागले आहेत, आमिरची लेक आयरा खानने देखील चाहत्यांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

आयराने आपल्या बॉयफ्रेंड आणि मित्र मैत्रिणीबरोबर फोटो शेअर करत या शुभेच्छा दिल्या आहेत. या फोटोंमध्ये दोघे पारंपरिक वेशात दिसत आहे. आयराने पांढरी साडी परिधान केली आहे, तर नुपूरने कुर्ता परिधान



केले आहे. दोघे फोटोंमध्ये नेहमीप्रमाणे आनंदी दिसत आहेत. त्यांच्या या फोटोवर नेटकऱ्यांनीदेखील कौतुक केले आहे.

काहींचं म्हणणं आहे ती दाक्षिणात्य अभिनेत्रीसारखी दिसत आहे. तर एकाने लिहले आहे ओणम सणाला साडी नेसतात तशी साडी आहे. साडीला जरा इस्त्री करायची असेही काहीजण म्हणालेत. काहींनी तिला आमिरवरून ट्रोल केले आहे.

## शॉर्ट न्यूज »

### “विराटनं टीकाकारांची तोंडं बंद...”



। मुंबई । महाईन्यूज

आशिया चषकापूर्वी विराट कोहलीचा फॉर्म चांगला चालत नव्हता. मात्र आशिया चषकात अफगाणिस्तानविरुद्ध शतक झळकावल्यानंतर तो अशा फॉर्ममध्ये परतला की, टी२० विश्वचषकाच्या पहिल्याच सामन्यात त्याने आपल्या टी२० क्रिकेटमधील सर्वोत्तम खेळी खेळली. पाकिस्तानविरुद्धच्या त्याच्या नाबाद ८२ धावांची केवळ माजी भारतीय खेळाडूच स्तुती करत नाहीत, तर संपूर्ण जग क्रिकेट त्याची खेळी पाहून त्याच्यापुढे नतमस्तक होत आहे. विराटच्या जवळचे मानले जाणारे भारताचे माजी मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री यांनीही त्याच्या या खेळीवर प्रतिक्रिया दिली आहे. इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना ते म्हणाले की, भारत आणि पाकिस्तान यांच्यातील आतापर्यंतचे सर्व सामने आम्ही पाहिले आहेत. हरिस रौफला मारलेले दोन षटकार भारतीय फलंदाजांनी खेळलेला सर्वोत्तम शॉट आहे.

# मार्कस स्टॉयनिसचे तुफानी अर्धशतक!

## यजमान ऑस्ट्रेलियाने श्रीलंकेचा सात गडी राखून केला पराभव

मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था

आयसीसी टी२० विश्वचषक २०२२ मध्ये ऑस्ट्रेलियाने त्यांच्या दुसऱ्या सामन्यात श्रीलंकेचा सात गडी राखून पराभव केला. ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेने ऑस्ट्रेलियासमोर १५८ धावांचे लक्ष्य ठेवले होते. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाच्या संघाने तीन गड्यांच्या मोबदल्यात १५८ धावांचे लक्ष पूर्ण केले. फिंच आणि मार्कस स्टॉयनिस शेवटपर्यंत खेळपट्टीवर नाबाद राहिले. फिंचने एक बाजू सांभाळून धरत स्टॉयनिसला मोकळे फटके मारण्याची मुभा दिली. त्याने १७ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. १८चेंडूत ५९ धावा केल्या आणि त्यालाच सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला.



ऑस्ट्रेलियाने २६ धावांवर डेव्हिड वॉर्नरची महत्त्वाची विकेट गमावली. त्याने १० चेंडूत ११ धावा केल्या आणि महेश तीक्षानाच्या चेंडूवर शनाकाकडे झेलबाद झाला. त्यानंतर धनंजयने मिचेल मार्शला राजपक्षेकरवी झेलबाद केले. मार्शने १७ धावा केल्या. १२ चेंडूत २३ धावा करून ग्लेन मॅक्सवेल करुणारत्नेचा बळी ठरला. भंडाराने त्याचा शानदार झेल सीमारेषेवर टिपला. तत्पूर्वी, श्रीलंकेसाठी पथुम निसांकाने ४५ चेंडूत ४० धावा केल्या. धनंजय डी सिल्वाने २६ धावा केल्या. शेवटी चरित असलंका (२५ चेंडूत ३८ धावा) आणि चमिका करुणारत्ने (सात चेंडूत १४ धावा) यांनी झटपट धावा करत संघाची धावसंख्या सहा बाद १५७ पर्यंत नेली. मार्कस स्टॉइनिस आणि मिचेल मार्श यांच्याशिवाय सर्व गोलंदाजांनी ऑस्ट्रेलियाच्या विकेट घेतल्या. मार्श आणि स्टोइनिस यांनाही महागात पाडले.

पॅट कमिन्सने शेवटच्या षटकात २० धावा दिल्या. त्यामुळे श्रीलंकेचा संघ १५७ धावांपर्यंत मजल मारण्यात यशस्वी ठरला. मात्र, या लक्ष्याचा पाठलाग करणे ऑस्ट्रेलियासाठी सोपे नसेल असे वाटत असताना त्याने तब्बल २१ चेंडू राखून सामना खिशात घातला.

# ऑस्ट्रेलियाला मोठा झटका

## श्रीलंकेविरुद्धच्या सामन्यापूर्वी गोलंदाजाला झाली कोरोनाची लागण

।ओडेन्से।
महाईन्यूज । वृत्तसंस्था

टी२० विश्वचषक२०२२ मध्ये आज पर्थमध्ये श्रीलंकेविरुद्धच्या सामन्यामुळे ऑस्ट्रेलियाला मोठा धक्का बसला आहे. ऑस्ट्रेलियाचा लेगस्पिनर अ‍ॅडम झाम्पा कोरोना पॉझिटिव्ह आढळला आहे. ऑस्ट्रेलिया संघाच्या प्रवक्त्याने झाम्पाची प्रकृती ठीक नसल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. त्यानंतर त्याची कोविड चाचणी करण्यात आली, ज्याचा अहवाल पॉझिटिव्ह आला आहे. मात्र, त्याला कोरोनाची किरकोळ लक्षणे आहेत. अशा स्थितीत पर्थमध्ये आज श्रीलंकेविरुद्धच्या सामन्यात तो खेळणार नसण्याची शक्यता आहे.

मात्र, तो सामन्याआधी निवडीसाठी उपलब्ध व्हावा, अशी संघ व्यवस्थापनाची विनंती केली आहे. ऑस्ट्रेलियन संघाने या सामन्यात झाम्पाचा प्लेइंग इलेव्हनमध्ये समावेश करण्याचा निर्णय घेतल्यास, त्यांना संघापासून वेगळे प्रवास करावा लागेल आणि उर्वरित खेळाडू आणि सपोर्ट स्टाफच्या संपर्कात राहू नये. टी२० विश्वचषकासाठी आयसीसीने कोरोना नियमांमध्ये केलेल्या बदलांनुसार, एखाद्या खेळाडूला कोरोना विषाणूची लागण झाल्याचे आढळल्यास त्याला अनिवार्य चाचणी करावी लागणार नाही किंवा त्याला काही दिवस आयसोलेशनमध्ये घालवावे लागणार नाही. त्याऐवजी, व्हायरसच्या संपर्कात आल्यानंतर खेळाडू सामना खेळण्यासाठी योग्य आहे की नाही हे संघाचे डॉक्टर ठरवतील. काही दिवसांपूर्वी ऑस्ट्रेलिया सरकारने कोरोना रुग्णांसाठी आयसोलेशनची अट रद्द केली आहे.



महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजिटल आवृत्ती छपाईसाठी नाही